# महिला व बालविकास आयुक्तालय

२८,राणीचा बाग ,जुन्या सर्किट हाउस शेजारी ,पुणे ०१.
Email: Commissionerwcdest@yahoo.in **दुरध्वनी क्र.** ०२०-२६३३७११७

## प्रसिध्दीपत्रक

आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अधिनस्त आस्थापनेवरील गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड या संवर्गातील **(१)** संरक्षण अधिकारी, गट- ब (अराजपत्रित)- २ पदे **(२)** परिविक्षा अधिकारी,गट-क ७२ पदे **(३ )** लघुलेखक (उच्चश्रेणी), गट-क १ पद **(४)** लघुलेखक (निम्नश्रेणी), गट-क २ पदे **(५)** वरिष्ठ लिपीक/सांख्यिकी सहायक, गट-क ५६ पदे **(६)** संरक्षण अधिकारी (कनिष्ठ), गट-क ५७ पदे **(७)** वरिष्ठ काळजी वाहक, गट-ड ४ पदे **(८)** कनिष्ठ काळजी वाहक, गट-ड ३६ पदे **(९)** स्वयंपाकी, गट-ड ६ पदे भूतपुर्व दुय्यम सेवा मंडळाच्या कक्षेतील निम्न नमुद सरळसेवा कोटयातील रिक्त असलेली पदे भरण्याकरीता पात्र उमेदवारांकडुन दि.१४-१०-२०२४ ते दि.१०-११-२०२४ ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात आलेले होते. सदर भरती प्रक्रियेच्या **कॉम्पुटरबेस्ड वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची ऑनलाईन परीक्षा राज्यातील ४५ परीक्षा केंद्रावर दि.१०-२-२०२५ ते दि.१३-२-२०२५ व दि.१७-२-२०२५ रोजी** विविध सत्रामध्ये आयोजित करण्यात आलेल्या होत्या.

१.सदर कॉम्पुटर बेस्ड वस्तुनिष्ठ ऑनलाईन परीक्षेच्या उत्तरतालिका व प्रश्नतालिका पाहण्याची तसेच प्रश्नतालिका /उत्तरतालिका याबाबत आक्षेप असल्यास ते सादर करण्याबाबतची ऑनलाईन सुविधा शुक्रवार दि.२८-२-२०२५. पासून उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदर सुविधेसाठी उमेदवारांनी https://www.wcdcommpune.com या संकेतस्थळावर विहीत आयडी व पासवर्डव्दारे लॉग इन करावे. **सदर परीक्षेच्या अनुषंगाने प्रश्नतालिका किंवा उत्तर तालिकेबाबत आक्षेप असल्यास, उमेदवारांनी असे आक्षेप केवळ ऑनलाईन पध्दतीनेच आवश्यक त्या कागदपत्रांसह दि.८-३-२०२५ पर्यंत सादर करावेत. दि.८-३-२०२५ नंतर कोणत्याही स्वरुपाचे आक्षेप स्विकारण्यात येणार नाहीत, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

२. उक्त नमुद परीक्षेच्या अनुषंगाने उपरोक्त नमुद करण्यात आलेल्या विहीत **ऑनलाईन पध्दतीनुसारच प्रश्नतालिका किंवा उत्तर तालिकेवर आक्षेप स्विकारण्यात येणार आहेत. इतर कोणत्याही पध्दतीने (लेखी पत्र/ निवेदन/ ईमेल/भ्रमणध्वनी व्दारे/एसएमएस) सादर केलेले आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत.**

३. संबधित उमेदवारांकडुन प्रत्येक आक्षेपाकरीता रु.१००/- इतके शुल्क केवळ ऑनलाईन पध्दतीनेच स्विकारण्यात येणार आहे. ऑनलाईन शुल्क सादर न केल्यास संबधित उमेदवारांचे आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत. **परीक्षेच्या अनुषंगाने प्राप्त आक्षेपाबाबत आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा निर्णय अंतिम राहील याची सर्व उमदेवारांनी नोंद घ्यावी.**

४. सदर भरती प्रक्रिया पारदर्शक पध्दतीने पार पाडण्यात येत असून उमदेवारांनी कोणत्याही प्रकारच्या अफवांवर विश्वास ठेवू नये. तसेच कोणत्याही व्यक्तीने सदर भरती प्रक्रियेबाबत गैरमार्गाने नोकरी देण्याचे/परीक्षा पास करुन देण्याचे किंवा तत्सम स्वरुपाचे आमिष दाखविल्यास अशा भूलथापांना बळी न पडता त्याबाबत नजिकच्या पोलीस स्टेशनकडे तात्काळ संपर्क साधून तक्रार करण्यात यावी.

५. भरती प्रक्रियेशी संबधीत अदयावत सूचना/प्रसिध्दीपत्रक याबाबतची माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी महिला व बाल विकास विभागाच्या https://www.wcdcommpune.com संकेतस्थळाला वेळोवेळी भेट देण्याबाबत

सर्व उमेदवारांना आवाहन करण्यात येत आहे. तसेच भरती प्रक्रियेच्या अनुषंगाने ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या भ्रमणध्वनी व ईमेलवर वेळोवेळी पाठविण्यात येणा-या सूचनांचे उमेदवारांनी पालन करावे.

६. https://www.wcdcommpune.com या संकेतस्थळावर लॉगिन करताना तांत्रिक अडचणी आल्यास संबधित उमेदवारांनी **७३५३००९०९४** या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा. सदर टोल फ्री क्रमांक सोमवार ते शनिवारी सकाळी ९.०० ते सायंकाळी ६.०० या कालावधीत सुरु राहील.

दिनांक :- २८/०२/२०२५

स्थळ :- पुणे

**(नयना अर्जुन गुंडे)** भा.प्र.से
**आयुक्त**
**महिला बाल विकास**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**

## WCD Recruitment Exam 2025, 10th Feb 2025 to 17th Feb 2025

Dear Candidates, Objection form is live for below post:

| Post Name Whose application form is Live |
|---|
| Stenographer (Higher Grade) |
| Stenographer (Lower Grade) |
| Probation Officer |
| Protection Officer Group B (Non-Gazetted) |
| Protection Officer Group C |
| Cook |
| Jr. caretaker |
| Sr. Caretaker |
| Senior Clerk |

### Steps to Fill the Objection form

Step 1: Click on application form link

Step 2: Candidates need to login with their application form credentials received at the time of registration.

Step 3: Click on "Apply Post" tab

Step 4: Click on "Eye" Button under "Actions" tab for Post

Step 5: Click on "Objection Form" tab

Step 6: Click on "Create" and fill your Objection form

Step 7: After filling the form, click on submit button and make the payment.